लिपिक - टंकलेखक परीक्षा - 2013

2013

परीक्षा दि. 02 जून, 2013

# A

CODE : **AO2**

प्रश्नपुस्तिका क्रमांक

BOOKLET NO.

## प्रश्नपुस्तिका

**मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, बुद्धिमापन चाचणी व अंकगणित**

वेळ : 2 ( दोन ) तास

एकूण प्रश्न : 200

एकूण गुण : 400

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 200 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ↑ केंद्राची संकेताक्षरे | | | | | | ↑ शेवटचा अंक | |

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच ''उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नांचे गुण वजा करण्यात येतील''.**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या ''परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82'' यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

1. खान्देश भागात बोलली जाणारी बोली कोणती ?

(1) अहिराणी (2) कोकणी (3) हळबी (4) डांगी

2. विजा चमकू लागल्या आणि पावसाला सुरूवात झाली.

या वाक्यात 'आणि' हे __________ आहे।

(1) समुच्चयबोधक उभयान्वयी अव्यय (2) क्रियाविशेषण

(3) केवलप्रयोगी अव्यय (4) क्रियापद

3. व्याकरण म्हणजे काय ?

(1) व्याकरणकारांनी लिहिलेली भाषा. (2) भाषेचे स्वरूप स्पष्ट करणे.

(3) भाषेचे स्पष्टीकरण करणारे शास्त्र. (4) भाषेची उपयुक्तता स्पष्ट करणे.

4. 'मुळाक्षरे' या साठी पर्यायी शब्द कोणता आहे ?

(1) शब्द (2) वर्णमाला (3) वर्णसंख्या (4) वर्णनमाला

5. ज्या क्रियापदाला दोन कर्मे लागतात अशा क्रियापदाला काय म्हणतात ?

(1) उभयविध (2) द्विकर्मक (3) विधानपूरक (4) अपूर्णविधान

6. अनेक गोष्टीत एकाचवेळी लक्ष देणाऱ्यास __________ म्हणतात.

(1) कामसू (2) अष्टावधानी

(3) कार्यरत (4) चौकस

7. तो गाणे गातो. (प्रयोग ओळखा)

(1) कर्मणी प्रयोग (2) भावे प्रयोग (3) कर्तरी प्रयोग (4) कर्मकर्तरी प्रयोग

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

8. विभक्तीच्या अर्थाने शब्दयोगी अव्यये नामास लागतात व ती लागण्यापूर्वी त्यांचे बहुधा सामान्यरूप होते त्या रूपास काय म्हणतात ?

(1) अधिकरण (2) संप्रदान

(3) करण (4) विभक्तीप्रतिरूपक अव्यये

---

9. प्रत्यक्षात असणाऱ्या वा कल्पनेने जाणलेल्या वस्तुंना किंवा त्यांच्या गुणधर्मांना जी नावे असतात त्यांना व्याकरणात काय म्हणतात ?

(1) विशेषण (2) नाम (3) क्रियापद (4) यापैकी एकही नाही

---

10. समानार्थी शब्दांच्या जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | अनल | (i) | तडाग |
| (ब) | तलाव | (ii) | पावक |
| (क) | झाड | (iii) | जोत्स्ना |
| (ड) | चांदणे | (iv) | पादप |

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (ii) | (iii) | (i) |
| (2) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| (3) | (ii) | (i) | (iv) | (iii) |
| (4) | (i) | (iii) | (iv) | (ii) |

---

11. खालीलपैकी **केवलप्रयोगी** अव्यय कोणते ?

(1) अरेरे ! (2) नाही (3) श्वसूर (4) गालावर

---

12. 'उद्देश्य' व 'विधेय' हे कशाचे घटक आहेत ?

(1) शब्दाचे (2) वाक्याचे (3) भाषेचे (4) अर्थाचे

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

13. पुढीलपैकी कोणत्या वाक्प्रचाराचा अर्थ बरोबर नाही ?

(1) त्राटिका - कजाग बायको (2) डोळे उघडणे - पश्चात्ताप होणे

(3) खडे फोडणे - दगड फोडणे (4) जिवापाड जपणे - मायेने सांभाळणे

---

14. रस व त्यांचे स्थायीभाव यांच्या जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | शांत | (i) | जुगुप्सा |
| (ब) | अद्‌भुत | (ii) | उत्साह |
| (क) | वीर | (iii) | शम |
| (ड) | बीभत्स | (iv) | विस्मय |

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (iii) | (iv) | (ii) |
| (2) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| (3) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (4) | (iv) | (i) | (ii) | (iii) |

---

15. अकारान्त नपुसकलिंगी नामाचे अनेकवचन कसे होईल ?

(1) उ-कारान्त (2) ए-कारान्त (3) ई-कारान्त (4) आ-कारान्त

---

16. पुढीलपैकी कोणता सामासिक शब्द समाहार द्वंद्व समासात आढळत नाही ?

(1) केरकचरा (2) नीलकंठ (3) घरदार (4) मीठभाकर

---

17. पुढीलपैकी अपूर्ण वर्तमानकाळाचे उदाहरण कोणते ?

(1) मी निबंध लिहिला आहे. (2) मी निबंध लिहीत आहे.

(3) मी निबंध लिहीत असतो. (4) मी निबंध लिहितो.

---

18. संस्कृत भाषेतील शब्द जसेच्या तसे मराठी भाषेत आले आहेत त्या शब्दांना काय म्हणतात ?

(1) तद्‌भव (2) देशी (3) परदेशी (4) तत्सम

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

19. 'चंद्रोदय' या जोडशब्दात एकत्र येणारे स्वर व संधी बनलेला वर्ण ओळखा.

(1) आ + उ = ओ (2) द्र + ओ = द्रो (3) अ + उ = ओ (4) र + ओ = रो

20. 'तू मला पुस्तक दिलेस' हे वाक्य कोणत्या प्रयोगातील आहे ?

(1) कर्तृ - कर्मसंकर प्रयोग (2) भावकर्तरी प्रयोग

(3) कर्म - भावसंकर प्रयोग (4) कर्तृ - भाव संकर प्रयोग

21. सामासिक शब्दाचे लिंग कोणत्या शब्दाच्या लिंगावरून ठरते ?

(1) पहिल्या शब्दाच्या लिंगावरून (2) दोन्ही शब्दांच्या लिंगावरून

(3) सामासिक शब्दाच्या लिंगावरून (4) शेवटच्या शब्दाच्या लिंगावरून

22. पुढील शब्दांतील उपसर्गघटित शब्द निवडा :

(1) रक्षक (2) अभिनंदन (3) विसराळू (4) भांडखोर

23. खालीलपैकी कोणता वर्ण तालव्य पद्धतीने उच्चारला जातो ?

(1) प् (2) च् (3) भ् (4) ट्

24. 'हालअपेष्टा सहन करण्याचा गुण' या शब्दसमूहाबद्दल समूहदर्शक शब्द कोणता ?

(1) स्थितप्रज्ञता (2) हिंमत (3) तितिक्षा (4) शौर्य

25. 'कवीश्वर' या शब्दातील संधीचा प्रकार कोणता ?

(1) विसर्गसंधी (2) स्वरसंधी (3) व्यंजनसंधी (4) पररूप संधी

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

26. पुढीलपैकी स्वरादीवर्ण ओळखा.

(1) इ - उ (2) अ - आ (3) अं - अः (4) ए - ओ

27. 'संरक्षण' हा शब्द अनुस्वाराच्या कोणत्या नियमानुसार लिहिला जातो ?

(1) स्पष्टोच्चारित अनुनासिकाबद्दल शीर्षबिंदू द्यावा.

(2) य्, र्, ल्, व्, श्, ष्, स्, ह्, श् या वर्णांपूर्वी येणाऱ्या अनुस्वारांबद्दल केवळ शीर्षबिंदू द्यावा.

(3) आदरार्थी बहुवचनी रूपावर अनुस्वार द्यावा.

(4) वरीलपैकी एकही नाही.

28. 'मी निबंध लिहितो' या वाक्याचा रीती भूतकाळ लिहा.

(1) मी निबंध लिहित असे. (2) मी निबंध लिहिला होता.

(3) मी निबंध लिहीत होतो. (4) मी निबंध लिहिला.

29. 'पिसू' या ऊ-कारान्त स्त्रीलिंगी नामाचे अनेकवचन कसे होते ?

(1) वा-कारान्त (2) या-कारान्त (3) आ-कारान्त (4) ई-कारान्त

30. 'रामकृष्ण' हे कोणत्या समासाचे उदाहरण आहे ?

(1) अव्ययीभाव समास (2) कर्मधारय समास

(3) बहुव्रीही समास (4) द्वंद्व समास

31. 'गंगा' या शब्दाचे षष्ठी विभक्तीचे रूप काय होईल ?

(1) गंगेसाठी (2) गंगेचा (3) गंगेला (4) गंगेत

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**32.** लेखननियमांनुसार शुद्ध शब्द ओळखा.

(1) कोट्यधीश (2) कोट्याधीश (3) कोट्यधिश (4) कोटटधिश

---

**33.** नामे व सर्वनामे यांचे वाक्यातील क्रियापदाशी किंवा इतर शब्दांशी संबंध ज्या विकारांनी दाखविले जातात त्या विकारांना __________ असे म्हणतात.

(1) वचन (2) लिंग (3) अव्यय (4) विभक्ती

---

**34.** दवाखाना, दिवाणखाना हे शब्द पुढीलपैकी कोणत्या भाषेच्या प्रभावातून आलेले आहेत ?

(1) फारसी (2) कन्नड (3) संस्कृत (4) गुजराती

---

**35.** 'कंटकाचा परित्याग करणे' – या वाक्यप्रचाराचा पुढीलपैकी अर्थ कोणता ?

(1) मर्यादा राखणे (2) काढून टाकणे

(3) अनिष्ट तेवढेच वगळणे (4) झोपडीचा त्याग करणे

---

**36.** अभंगाचे मुख्य दोन प्रकार कोणते ?

(1) मोठा अभंग व लहान अभंग (2) जुने अभंग व नवे अभंग

(3) छंद व ओवी (4) यादवकालीन अभंग आणि आधुनिक काळातील अभंग

---

**37.** 'जागृती' या शब्दाच्या अर्थाचा योग्य पर्याय ओळखा.

(1) झोप येण्याची अवस्था (2) सावधपणा

(3) सहानुभाव (4) स्वप्नावस्था

---

**38.** "All that glitters is not gold".

ह्या इंग्रजी म्हणीच्या समानार्थी म्हणीचा पर्याय पुढील पर्यायातून निवडा.

(1) चकाकते ते सारे सोने नसते (2) सोन्याहून पिवळे

(3) नाव सोनुबाई हाती कथिलाचा वाळा (4) सोन्याची सुरी गळ्यात बांधता येत नाही.

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

39. क्रियाविशेषण अव्यय व त्याचे प्रकार यांच्या जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | कालवाचक क्रियाविशेषण अव्यय | (i) | पलीकडे |
| (ब) | स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यय | (ii) | मोजके |
| (क) | रीतीवाचक क्रियाविशेषण अव्यय | (iii) | क्षणोक्षणी |
| (ड) | परिमाणवाचक क्रियाविशेषण अव्यय | (iv) | सावकाश |

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| (2) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (3) | (iv) | (ii) | (iii) | (i) |
| (4) | (i) | (iii) | (ii) | (iv) |

40. 'वाक्यातील विराम बदलला की वाक्याचा अर्थ बदलतो' यास काय म्हणतात ?

(1) बलाघात (2) सीमासंधी (3) सुरावली (4) व्यंजनद्वित्त

41. खालीलपैकी **शुद्ध** शब्द कोणता ?

(1) नीयुक्त (2) नीयूक्त (3) नियुक्त (4) नियुत्क

42. सहज सख्या एकदाच येई सांजवेळी ॥

या काव्यातील रस ओळखा ?

(1) करुण (2) श्रृंगार (3) वीर (4) शांत

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

43. योग्य जोड्या लावा

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | वसला | (i) | ई-आख्यात |
| (ब) | बसे | (ii) | वाख्यात |
| (क) | बसावा | (iii) | ऊ-आख्यात |
| (ड) | बसू | (iv) | ताख्यात |
| | | (v) | लाख्यात |

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (v) | (iii) | (i) |
| (2) | (iv) | (ii) | (i) | (v) |
| (3) | (v) | (i) | (ii) | (iii) |
| (4) | (i) | (iii) | (v) | (iv) |

44. अनल-वन्ही, आश्चर्य-विस्मय, कावळा-वायस तर अश्व या शब्दासाठी समानार्थी शब्द कोणता?

(1) सुधा (2) शैल (3) मृगेंद्र (4) हय

45. 'उपपद' किंवा 'कृदन्त - तत्पुरुष' समासाचे उदाहरण कोणते?

(1) नास्तिक (2) रक्तचंदन (3) अहिंसा (4) पांथस्थ

46. उपसर्गघटित, प्रत्ययघटित व सामासिक हे कोणत्या शब्दांचे प्रकार आहेत?

(1) सिद्ध शब्द (2) साधित शब्द (3) देशी शब्द (4) परभाषिक शब्द

47. पुढील गटातील 'परसवर्ण' शब्दांचा गट ओळखा?

(1) चंपक, घंटा, संत (2) थट्टा, पक्का, खड्डा
(3) पण्डित, चञ्चल, गङ्गा (4) उच्च, पुण्य, मित्र

48. 'आई त्या मुलाला हसविते' हे उदाहरण क्रियापदाच्या कोणत्या प्रकारात मोडते?

(1) प्रयोजक (2) शक्य (3) अनियमित (4) सहायक

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

49. 'खसखस पिकणे' या वाक्प्रयोगाचा अर्थ लिहा.

(1) मोठमोठ्याने बोलणे (2) खसखशीचे दाणे पिकणे

(3) जखमा होणे (4) मोठ्याने हसणे

50. 'काकदृष्टीने' पाहणे या म्हणीचा अर्थ लिहा.

(1) डोळे बारीक करून पाहणे (2) दुरून पाहणे

(3) बारकाईने न्याहाळणे (4) जवळून पाहणे

51. मंगळ ग्रहासंदर्भात संशोधन करण्यासाठी कोणते अवकाशयान सध्या कार्यरत आहे ?

(1) क्युरिऑसिटी (2) ॲबसॉल्युट (3) सोयुझ (4) गॅलेक्सी

52. एल.सी.ए. 'तेजस' भारतीय सैन्यदलासाठी काय आहे ?

(1) विमान (2) क्षेपणास्त्र (3) रणगाडा (4) हेलिकॉप्टर

53. 1980 मध्ये दुसऱ्या मागास वर्ग आयोगाचे अध्यक्ष कोण होते ?

(1) श्री. बी.पी. मंडल (2) श्री. काका साहेब कालेलकर

(3) श्री. वी.पी. सिंग (4) या पैकी कोणीही नाहीत

54. 2012 च्या ज्ञानपीठ पुरस्कारासाठी निवड झालेले डॉ. रावुरी भारद्वाज हे कोणत्या भाषेतून साहित्यसेवा करतात ?

(1) कन्नड (2) हिंदी (3) तेलगु (4) तमीळ

55. 15 व्या लोकसभा निवडणुकीनुसार भारतात अनुसूचित जातीसाठी किती मतदार संघ राखीव आहेत ?

(1) 78 (2) 42 (3) 79 (4) 41

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

56. अनिल काकोडकर यांचेबाबतीत पुढीलपैकी कोणती विधाने योग्य वाटतात?

(अ) ते ज्येष्ठ अणूशास्त्रज्ञ आहेत.

(ब) त्यांना महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित केले आहे.

(क) ते अर्थतज्ञ असून त्यांना शासनाने सन्मानित केले आहे.

(ड) ते साहित्यिक असल्याने अधिक प्रसिद्ध आहेत.

(1) (अ), (ब), (क) आणि (ड) बरोबर आहेत.

(2) (अ) आणि (ब) बरोबर आहेत.

(3) (अ) आणि (क) बरोबर आहेत.

(4) (अ) आणि (ड) बरोबर आहेत.

---

57. खालीलपैकी मूलभूत अधिकार कोणते आहेत?

(अ) माहितीचा अधिकार

(ब) पिळवणूकीविरूद्धचा अधिकार

(क) धर्मस्वातंत्र्याचा अधिकार

(ड) मानव अधिकार

वरील पर्यायांपैकी कोणता पर्याय बरोबर आहे?

(1) फक्त (अ) (2) फक्त (ब) आणि (क)

(3) फक्त (क) आणि (ड) (4) सर्वच

---

58. 'क्षय' हा रोग कशामुळे होतो?

(1) विषाणुमुळे (2) जीवाणूमुळे

(3) प्रदूषणामुळे (4) अनियंत्रित पेशींच्या वाढीमुळे

---

59. आंतरराष्ट्रीय नेमबाजी संघटनेद्वारे आयोजित जागतिक स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारी पहिली भारतीय महिला नेमबाज कोण?

(1) अंजली भागवत (2) सुमा शिरूर (3) राही सरनोबत (4) अंजली शर्मा

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

60. सन 1836 साली दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी कोणता ग्रंथ लिहिला ?

(1) महाराष्ट्र भाषेचे व्याकरण (2) यमुनेचे पर्यटन

(3) मराठी भाषेचे व्याकरण (4) महाराष्ट्र भाषेची पाणिनी

61. खालीलपैकी 'आंतरराष्ट्रीय मानव अधिकार दिन' कोणत्या दिवशी पाळला जातो ?

(1) 10 जून (2) 10 डिसेंबर (3) 10 सप्टेंबर (4) 26 नोव्हेंबर

62. ख्रिश्चनांचे सर्वोच्च 16 वे धर्मगुरु __________ यांनी 2013 मध्ये आपल्या पदाचा राजीनामा दिला.

(1) पोप ग्रेगरी (2) पोप जॉन पॉल (3) पोप सेलेस्टाईन (4) पोप बेनेडिक्ट

63. फेमिना मिस इंडिया 2013 ची विजेती कोण आहे ?

(1) वन्या मिश्रा (2) झोया अफरोझ

(3) शोभिता धोलियाला (4) नवनीत कौर धिल्लन

64. भारतातील पहिले व्यसनमुक्ती साहित्य संमेलन कोठे आयोजित करण्यात झाले ?

(1) दिल्ली (2) मुंबई (3) पुणे (4) सातारा

65. 'राष्ट्रीय माध्यमिक शिक्षण अभियान' केव्हा सुरू करण्यात आले ?

(अ) मार्च 2009

(ब) जानेवारी 2005

(क) ऑक्टोबर 2010

(ड) यापैकी नाही

वरील पर्यायांपैकी कोणता पर्याय बरोबर आहे ?

(1) फक्त (अ) (2) फक्त (ड) (3) फक्त (ब) (4) फक्त (क)

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

66. राज्य शासनाचा पहिला पं. भीमसेन जोशी जीवन गौरव पुरस्कार कोणास प्रदान करण्यात आला?

(1) पं. जसराज
(2) पं. संजीव अभ्यंकर
(3) किशोरी अमोणकर
(4) आरती अंकलीकर-टिकेकर

67. संविधान तयार करण्यासाठी संविधान सभेने किती समित्या तयार केल्या होत्या?

(1) 22 (2) 11 (3) 7 (4) 24

68. जोड्या लावा :

(अ) मालिनी राजूरकर — (I) नोबेलकरिता नामांकन
(ब) मलाला युसुफझाई — (II) पद्म पुरस्कार नाकारला.
(क) जगदीश शरण वर्मा — (III) गायन
(ड) एस. जानकी — (IV) महिलांवरील बलात्कार चौकशी समिती प्रमुख

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (IV) | (III) | (II) | (I) |
| (2) | (I) | (IV) | (III) | (II) |
| (3) | (III) | (I) | (IV) | (II) |
| (4) | (II) | (III) | (I) | (IV) |

69. नागरिक अधिकाराची सनद (सिटिझन चार्टर) विधेयकाला नुकतीच केंद्रीय मंत्रीमंडळाने मंजुरी दिली. खालीलपैकी कोणत्या विधानांशी या विधेयकाचा संबंध येईल?

(अ) गरिबांना धान्य मिळणार आहे.
(ब) सरकारी अधिकाऱ्याचे अधिकार वाढणार आहेत.
(क) सरकारी कर्मचाऱ्यांना सर्वसामान्यांचे काम वेळेत पूर्ण करावे लागणार आहे.
(ड) न्यायालयाचे निर्णय वेळेत घ्यावे लागणार आहेत.

(1) (अ), (ब), (क) आणि (ड) यांच्याशी संबंधित आहे.
(2) फक्त (क) शी संबंधित आहे.
(3) (ब), (क) आणि (ड) यांच्याशी संबंधित आहे.
(4) फक्त (अ) शी संबंधित आहे.

70. न्याय पंचायतीकडे तंटे देण्यापूर्वी मध्यस्थी करण्याचा अधिकार कोणाला आहे?

(अ) विकास गटाला

(ब) ग्रामपंचायतीला

(क) पंचायत समितीला

(ड) वरील सर्वांना

वरील पैकी कोणते विधान बरोबर आहे?

(1) (अ) आणि (क) फक्त

(2) (ब) फक्त

(3) (अ), (क) आणी (ड) फक्त

(4) (ड) फक्त

---

71. खालीलपैकी चुकीची जोडी ओळखा?

(1) हरिहर व बुक्क - विजयनगर

(2) हसनगंगू बहामनी - बहामनी

(3) सिकंदर लोदी - लोदी घराणे

(4) जहिरूद्दीन मोहम्मद बाबर - मोगल

---

72. खालीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत?

(अ) चंपारण्य नीळ सत्याग्रह - 1917

(ब) खेडा सारावंदी चळवळ - 1918

(क) जालियनवाला बाग हत्याकांड - 1919

(ड) स्वराज्य पक्षाची स्थापना - 1922

वरील पर्यायांपैकी कोणते पर्याय बरोबर आहेत?

(1) (अ) आणि (ब) फक्त

(2) (ब) आणि (क) फक्त

(3) (अ) आणि (क) फक्त

(4) वरील सर्व

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

73. जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | मराठ्यांचा सेनापती | (I) | मराठी आरमाराचा प्रमुख |
| (ब) | कान्होजी आंग्रे | (II) | हंबीरराव मोहीते |
| (क) | बुंदेलखंडचा राजा | (III) | निजामाचा पराभव |
| (ड) | राक्षस भुवनची लढाई | (IV) | छत्रसाल |

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (I) | (II) | (III) | (IV) |
| (2) | (II) | (I) | (IV) | (III) |
| (3) | (I) | (III) | (II) | (IV) |
| (4) | (IV) | (III) | (II) | (I) |

74. 'ईश्वराने स्त्री व पुरुष सारखेच निर्माण केले आहेत, म्हणून त्यांचे अधिकारही समान आहेत' - ह्या शब्दात स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार पुढीलपैकी कोणी केला ?

(1) गोपाळ हरी देशमुख (लोकहितवादी) (2) विष्णुशास्त्री चिपळूणकर

(3) महात्मा फुले (4) दादोबा पांडुरंग तरखडकर

75. छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेकप्रसंगी काढलेली तांब्याची नाणी कोणती ?

(1) होन (2) दाम (3) शिवराई (4) टंका

76. बाळासाहेब ठाकरे मुंबईतून प्रसिद्ध होणाऱ्या कोणत्या मराठी व्यंगचित्र साप्ताहिकाचे संपादक होते ?

(1) अवंती (2) वेदांती (3) तार्कीक (4) मार्मिक

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

77. छत्रपती शिवाजी महाराज ह्यांच्या संदर्भातील खालील घटना कालक्रमानुसार लावा ?

(अ) छत्रपती शिवाजी महाराजांची सुरतेवर स्वारी

(ब) पुरंदरचा तह

(क) छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक

(ड) छत्रपती शिवाजी महाराज आग्र्यास बादशहाच्या भेटीस गेले

वरील पर्यायांपैकी कोणता पर्याय बरोबर आहे ?

(1) (क), (ब), (ड) आणि (अ)  (2) (क), (अ), (ड) आणि (ब)

(3) (अ), (ब), (ड) आणि (क)  (4) (अ), (ब), (क) आणि (ड)

---

78. शांकुतल या संस्कृत नाटकाचा मराठीत अनुवाद पुढीलपैकी कोणी केला आहे ?

(1) महादेवशास्त्री कोल्हटकर  (2) परशुराम बल्लाळ गोडबोले

(3) शिवरामशास्त्री खरे  (4) कृष्णशास्त्री राजवाडे

---

79. खालीलपैकी कोणता अभंग संत नामदेवाने लिहिलेला नाही ?

(अ) ''योगयाग विधी येणे नोहे सिद्धी। वायांची उपाधी। दंभधर्म''

(ब) ''न लगे मज काही। ऋद्धिसिद्धी पाही। मुक्ती सुख तेही न लगे मज''

(क) ''मुक्तपण आम्हा नको देवराया। भेटी मज पाया पुरे बापा''

(ड) ''बहु पुरुषार्थी शिरी भक्ति जैसी।''

वरील पर्यायांपैकी कोणता पर्याय बरोबर आहे ?

(1) (अ) फक्त  (2) (ब) आणि (क) फक्त

(3) (ब) आणि (ड) फक्त  (4) वरील सर्व

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

80. राष्ट्रीय सभेच्या स्थापनेपूर्वी ब्रिटीश सत्तेविरूद्ध महाराष्ट्रात सशस्त्र उठाव कोणी केले ?

(अ) चंद्रशेखर आझाद

(ब) उमाजी नाईक

(क) वासुदेव बळवंत फडके

(ड) नाना साहेब पेशवे

(1) (ब) आणि (क) फक्त
(2) (अ) आणि (ब) फक्त
(3) (ब) आणि (ड) फक्त
(4) वरील सर्व

---

81. सह्याद्री पर्वताच्या पूर्वेस, पूर्व-पश्चिम पसरलेल्या पर्वत रांगांचा क्रम दक्षिणेकडून उत्तरेकडे खालीलपैकी कोणत्या क्रमाने आहे ?

(अ) शंभूमहादेव डोंगर

(ब) सातमाळ अजंठा डोंगर

(क) हरिश्चंद्र-बालाघाट डोंगर

(ड) तोरणमाळ

(1) (अ), (ब), (क) आणि (ड)
(2) (ड), (ब), (अ) आणि (क)
(3) (अ), (क), (ड) आणि (ब)
(4) (अ), (क) आणि (ब)

---

82. महाराष्ट्रातील खालीलपैकी कोणत्या जिल्ह्यात सर्वात जास्त सिंचन तीव्रता आहे ?

(1) भंडारा - गोंदिया
(2) कोल्हापूर - सोलापूर
(3) अहमदनगर - पुणे
(4) अकोला - अमरावती

---

83. सन 2006 पासून राज्य सरकारने कोणती ''वनग्राम योजना'' सुरु केली ज्या योजने अंतर्गत वृक्षतोड थांबवली जाते आणि वनसंपत्तीचे संरक्षण केले जाते ?

(1) संत गाडगेबाबा
(2) संत रामदास स्वामी
(3) आदिवासी कल्याण
(4) संत तुकाराम

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

84. महाराष्ट्रातील खालीलपैकी कोणता पवनउर्जा प्रकल्प आशिया खंडातील सर्वात मोठा पवन उर्जा प्रकल्प आहे ?

(1) वनकुसवडे (2) विजयदुर्ग (3) धुळे (4) देवगड

85. संयुक्त वसाहतीमध्ये सर्वात लहान खेड्याच्या नावापुढे लावले जाणारे विशेषण ?

(1) बुद्रुक (2) खुर्द (3) कसबा (4) वाडी

86. जोड्या लावा :

| **स्तंभ 1** | | **स्तंभ 2** | |
|---|---|---|---|
| **फळे** | | **संशोधन केंद्रे** | |
| (अ) | काजू | (I) | रत्नागिरी |
| (ब) | नारळ | (II) | श्रीरामपूर |
| (क) | सुपारी | (III) | वेंगुर्ला |
| (ड) | मोसंबी | (IV) | श्रीवर्धन |

| | **(अ)** | **(ब)** | **(क)** | **(ड)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (IV) | (III) | (II) | (I) |
| (2) | (I) | (III) | (IV) | (II) |
| (3) | (III) | (I) | (IV) | (II) |
| (4) | (III) | (I) | (II) | (IV) |

87. द्वैभाषिक मुंबई राज्याची स्थापना आणि महाराष्ट्र राज्याची स्थापना अनुक्रमे या दिवशी झाली :

(1) 1 ऑक्टोबर 1957/1 जानेवरी 1960 (2) 1 नोव्हेंबर 1956/1 मे 1960

(3) 1 मे 1960/1 नोव्हेंबर 1956 (4) 1 जानेवरी 1960/30 नोव्हेंबर 1967

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**88.** दिशा व महाराष्ट्र राज्याच्या सीमेवरील राज्ये-योग्य जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | वायव्य | (I) | मध्य प्रदेश |
| (ब) | उत्तर | (II) | छत्तीसगढ |
| (क) | पूर्व | (III) | कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि गोवा |
| (ड) | दक्षिण | (IV) | गुजरात |

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (I) | (II) | (III) | (IV) |
| (2) | (IV) | (II) | (I) | (III) |
| (3) | (IV) | (I) | (II) | (III) |
| (4) | (I) | (IV) | (II) | (III) |

**89.** सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबोली घाटाजवळ कोणत्या नदीचा उगम झाला आहे ?

(1) तेरेखोल (2) कात्राई (3) माणगंगा (4) कामुरी

**90.** महाराष्ट्रात मँग्नीजचे प्रमुख साठे कोणत्या जिल्ह्यात आढळतात ?

(1) भंडारा, गोंदिया, धुळे आणि सिंधुदुर्ग फक्त

(2) भंडारा, गोंदिया आणि नागपूर फक्त

(3) भंडारा, गोंदिया, नागपूर आणि सिंधुदुर्ग फक्त

(4) भंडारा, गोंदिया, धुळे आणि नागपूर फक्त

**91.** खालील पैकी विजोड पद ओळखा.

58, 97, 67, 94

(1) 58 (2) 97 (3) 67 (4) 94

**92.** सचिन व रमेश 'क्ष' ठिकाणापासून एकमेकांच्या विरुद्ध दिशेने प्रत्येकी 3 कि.मी. अंतर चालत जातात. त्यानंतर ते दोघेही स्वत:च्या उजवीकडे वळून सरळ 4 कि.मी. जातात. तर ते दोघे एकमेकांपासून किती अंतरावर आहेत ?

(1) 8 (2) 14 (3) 10 (4) 16


**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK





**93.** जर शिक्षकदिन शुक्रवारी आला असेल तर त्याच वर्षी गांधी जयंती कोणत्या दिवशी येईल?

(1) मंगळवार (2) बुधवार (3) शुक्रवार (4) गुरुवार

---

**94.** खाली एक गुंतागुंतीची आकृती दिलेली आहे. दिलेल्या पर्यायांपैकी कोणती आकृती दिशा न बदलता प्रश्न आकृतीत दडलेली आहे ते ओळखा.



(1)  (2)  (3)  (4) 

---

**95.** जर 3 + 4 = 6427, 6 + 2 = 8216 तर 5 + 1 = ?

(1) 5125 (2) 5115 (3) 1225 (4) 1125

---

**96.** खालील मालिकेत 7 नंतर 17 ही संख्या किती वेळा आलेली आहे?

717771771711717171771777111717171171771

(1) 8 (2) 9 (3) 10 (4) 11

---

**97.** एका सांकेतिक भाषेत

गमन मरण गजर नरम

426 235 413 632

तर नजर हा शब्द कसा लिहावा लागेल?

(1) 613 (2) 631 (3) 653 (4) 615

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

98. प्रश्नचिन्हाच्या जागी येणारा शब्द कोणता ?

वैशाख : चैत्र : : ? : जानेवारी

(1) डिसेंबर (2) फेब्रुवारी (3) मार्च (4) एप्रिल

---

99. एका रांगेत अनुजाच्या डाव्या बाजूला चौथ्या क्रमांकावर असलेल्या सीमाचा उजवीकडून दहावा व डावीकडून चौदावा क्रमांक आहे तर अनुजाचा रांगेतील क्रमांक कोणता ?

(1) डावीकडून सहावा (2) डावीकडून सोळावा (3) उजवीकडून पाचवा (4) उजवीकडून सहावा

---

100. एका रांगेत 25 आंब्याची झाडे आहेत. प्रत्येक दोन झाडांमध्ये 2 मीटर अंतर आहे. तर पहिल्या व शेवटच्या झाडामध्ये किती अंतर आहे ?

(1) 50 मी. (2) 42 मी. (3) 48 मी. (4) 52 मी.

---

101. पुढील माहितीवरून ☹ हे चिन्ह कोणती संख्या दर्शविते ?

☺ + ☹ = 786

☺ + ☺ = 600

(1) 300 (2) 600 (3) 486 (4) 386

---

102. एका सांकेतिक भाषेत 'INDIA' हा शब्द 13416 व 'WORLD' हा शब्द 75284 असा लिहितात तर 'DONALD' हा शब्द कसा लिहाल ?

(1) 453684 (2) 455842 (3) 453674 (4) 456384

---

103. राजारामकडे माधवपेक्षा 60 रु. जास्त आहेत. माधवने त्याच्याजवळच्या सर्व रकमेची लॉटरी तिकीटे खरेदी केली. माधवला त्याच्याजवळ असलेल्या रकमेच्या तिप्पट रक्कम लॉटरीमधून मिळाली. तेव्हा त्याच्याकडे सुरवातीस दोघांकडे असणाऱ्या एकूण रकमेपेक्षा 40 रु. जास्त होते. तर राजारामकडे किती रुपये होते ?

(1) 160 (2) 320 (3) 70 (4) 140

---

104. दिलेल्या शृंखलेत क्रमाने येणारी पुढील संख्या कोणती ?

1, 5, 21, 57, 121, ___?___.

(1) 150 (2) 176 (3) 221 (4) 202

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

**105.** जर घड्याळ 12 तासांऐवजी 8 ताशी केले तर 3 च्या विरुद्ध (समोर) कोणता अंक येईल?

(1) 5 (2) 6 (3) 7 (4) 8

---

**106.** खालील संख्या पिरॅमिडचे निरीक्षण करून त्या आधारे प्रश्नार्थक चिन्हाच्या ठिकाणी योग्य पर्याय निवडा.

2109 : 41213 : : 951015 : ?

1

2 3 4

5 6 7 8

9 10 11 12 13


14 15 16 17 18 19

20 21 22 23 24 25 26

(1) 1281318 (2) 8121813 (3) 1812813 (4) 1381218

---

**107.** सोबतच्या आकृतीत एकूण किती कोन आहेत?



(1) 12 (2) 21 (3) 15 (4) 28

---

**108.** दिलेल्या संख्यामालेत प्रश्नचिन्हाच्या जागी कोणती संख्या येईल?

2, 4, 5, 10, 12, 24, 27, ___?___.

(1) 81 (2) 54 (3) 38 (4) 34

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**109.** सोबतची बेरीज पूर्ण होण्यास P, Q, R या अक्षरांसाठी अनुक्रमे कोणते अंक घ्यावे लागतील ?

| | | | |
|---|---|---|---|
| | P | Q | R |
| + | P | Q | R |
| + | P | Q | R |
| | 4 | 4 | 4 |

(1) 1, 4, 8 (2) 1, 8, 4 (3) 8, 1, 4 (4) 1, 7, 4

---

**110.** शाळेतील 700 मुलांपैकी 216 मुले मराठी विषयात उत्तीर्ण झाली, 200 मुले इंग्रजी विषयात व 284 मुले हिंदी विषयात उत्तीर्ण झाली. एकूण मुलांपैकी 70 मुले मराठी व हिंदी या दोन्ही विषयात उत्तीर्ण झाली, 40 मुले मराठी व इंग्रजी आणि 20 मुले हिंदी व इंग्रजी विषयात उत्तीर्ण झाली. 10 मुले तीनही विषयात उत्तीर्ण झाली तर एकाही विषयात उत्तीर्ण न होणाऱ्या मुलांची संख्या किती ?

(1) 120 (2) 130 (3) 140 (4) 150

---

**111.** एका मैदानावर कवायतीसाठी एका रांगेत जितकी मुले उभी होती तितक्याच रांगा होत्या. मध्यभागी असणाऱ्या रांगेत राजू मध्यभागी उभा असल्यास त्या क्रिडांगणावर कवायतीसाठी उभ्या असलेल्या मुलांची संख्या दिलेल्या पर्यायांमधून निवडा.

(1) 125 (2) 36 (3) 64 (4) 121

---


**112.** प्रश्नचिन्हाच्या जागी कोणता शब्द येईल ?





तपटा : थफठा : : चटका : ?

(1) थटखा (2) छठका (3) थठखा (4) छठखा

---

**113.** खाली दिलेल्या आकृतीची आरशातील प्रतिमा कशी दिसेल ?



(1)  (2)  (3)  (4) 

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**114.** खालील मालिकेत प्रश्नचिन्हाच्या जागी काय येईल?

卐○✡ ○✡卐 ✡卐○ ?

(1) 卐✡○ (2) 卐○✡ (3) ○卐✡ (4) ✡○卐

---

**115.** जर 4*9=97, 3*7=58 तर 9*2=?

(1) 85 (2) 75 (3) 65 (4) 45

---

**116.** जर 82 ÷ 23 = 2, 45 ÷ 27 = 1, 69 ÷ 32 = 3 तर 97 ÷ 26 = किती?

(1) 1 (2) 2 (3) 3 (4) 4

---

**117.** पहिल्या दोन अक्षरसमूहांमध्ये जो संबंध आहे, तोच नंतरच्या दोन अक्षरसमूहांमध्ये आहे; तर प्रश्नाचिन्हाच्या जागी येणारे पद शोधा?

TEACHER : SDIBBDU : : DOCTOR : ?

(1) SUNBPC (2) SNUBPC (3) SUBPCN (4) SNPCBU

---


**118.** प्रश्नार्थक चिन्हाच्या जागी योग्य पर्याय निवडा.





PQRS : WVUT : : MNOP : ?

(1) QRTS (2) QRST (3) TSQR (4) TSRQ

---

**119.** खालील आकृतीची घडी घालून घन तयार केला. हा घन पर्यायातील कोणत्या घनासारखा दिसू शकेल?



(1)  (2)  (3)  (4) 

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

**120.** संदीपच्या पुढे दोन मुले सोडून त्याच रांगेत 7 मुली उभ्या आहेत. आणि संदीपच्या पाठीमागे 7 मुले सोडून त्याच रांगेत 10 मुली उभ्या आहेत तर मुलांची संख्या मुलींच्या संख्येपेक्षा कितीने कमी आहे ?

(1) 17 (2) 9 (3) 8 (4) 7

---

**121.** A हा B चा मुलगा आहे. C हा B चा शालक (साला) आहे. D हा C चा सख्खा भाऊ आहे E ही D ची पत्नी आहे. तर A शी E चे नाते कोणते ?

(1) मामे बहीण (2) आते बहीण (3) आत्या (4) मामी

---

**122.** एका सांकेतिक भाषेत,

"He is teacher" करिता "Boy asks father."


"He teaches maths" करिता "Boy plays cricket."

"Teacher teaches science" करिता "Father plays cinema." असेल तर 'Science' साठी कोणता शब्द वापरला आहे ?

(1) cinema (2) plays (3) cricket (4) asks

---

**123.** फाशाच्या दोन मुद्रा दिल्या आहेत. त्यावरून फाशाच्या तळावर 4 बिंदू असताना वरच्या पृष्ठभागावर किती बिंदू असतील ?



(1) 2 (2) 5 (3) 3 (4) 6

---

**124.** (अ) 'A' हा 'C' चा भाऊ आहे.

(ब) 'E' ही 'A' ची बहीण आहे.

(क) 'H' हा 'G' चा भाऊ आहे.

(ड) 'G' ही 'C' ची मुलगी आहे.





(इ) 'S' हा 'E' चा बाप आहे.

तर 'H' चा काका कोण ?

(1) 'A' (2) 'C' (3) 'G' (4) 'S'


---

**125.** सजीव, कावळा व झाड दाखविण्यासाठी पुढीलपैकी कोणती वेन आकृती योग्य आहे ?

(1)  (2)  (3)  (4) 

---

**126.** पुढील त्रिकोणातील प्रश्नचिन्हाच्या जागी कोणती संख्या येईल ?




(1) 23 (2) 26 (3) 31 (4) 19

---

**127.** परवा सोमवार होता आणि उद्या 20 तारीख आहे तर पुढच्या बुधवारी किती तारीख असेल ?

(1) 25 (2) 26 (3) 27 (4) 28

---

**128.** रेशमाचे वय तिच्या भावाच्या वयाच्या $\frac{1}{2}$ आणि आईच्या वयाच्या $\frac{1}{6}$ पट आहे. भावाच्या व आईच्या वयातील फरक 24 वर्षे असल्यास रेशमा व तिचा भाऊ यांच्या वयांची बेरीज किती ?

(1) 20 वर्षे (2) 24 वर्षे (3) 16 वर्षे (4) 18 वर्षे

---

**129.** A व B या दोघांनी शाळेपासून चालण्यास एकाच वेळी सुरूवात केली. A हा 4 कि.मी. उत्तरेकडे चालत गेला नंतर उजव्या बाजूला वळून 5 कि.मी. चालला. तर B हा पश्चिमेकडे 6 कि.मी. चालत गेला नंतर उजव्या बाजूला वळून पुन्हा 4 कि.मी. चालला तर A हा B पासून किती अंतरावर आहे ?

(1) 9 कि.मी. (2) 10 कि.मी. (3) 11 कि.मी. (4) 12 कि.मी.

---

**130.** जर 8 π 4=3, 9 π 6=5 तर 7 π 5=?

(1) 2 (2) 4 (3) 6 (4) 8

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

131. जर एक डझन केळींची किंमत 1 रु. ने वाढवली तर 840 रूपयांना मिळणारी केळी दोन डझन ने कमी होतील. 1 डझन केळ्यांची मूळ किमंत काढा?

(1) रु. 18 (2) रु. 19 (3) रु. 20 (4) रु. 21

132. एका भूमिती *श्रेढीची* तीन *क्रमागत* पदे शोधा ज्यांची पहिल्या दोन पदांची बेरीज 9 असून तिन्ही पदांचा गुणाकार 216 असा आहे.

(1) $2, 7, \frac{108}{7}$ (2) 3, 6, 18 (3) 3, 6, 12 (4) 4, 5, 9

133. रामने पाच रूपयांची व दोन रूपयांची मिळून पोस्टाची 30 तिकिटे खरेदी केली व पोस्टमास्तरला 90 रूपये दिले. यावरून प्रत्येक प्रकारची किती तिकिटे खरेदी केली ते काढा?

(1) पाच रूपयांची = 10, दोन रूपयांची = 20
(2) पाच रूपयांची = 15, दोन रूपयांची = 15
(3) पाच रूपयांची = 5, दोन रूपयांची = 25
(4) पाच रूपयांची = 6, दोन रूपयांची = 24

134. 18 मीटर लांब तार दोन भागात तोडली. एका भागाची लांबी दुसऱ्या भागाच्या $\frac{4}{5}$ पट आहे तर मोठ्या भागाच्या तारेची लांबी किती मीटर राहील?

(1) 10 मीटर (2) 12 मीटर (3) 16 मीटर (4) 18 मीटर

135. $\frac{(739+287)^2 + (739-287)^2}{739 \times 739 + 287 \times 287}$ ची किंमत काढा?

(1) 2 (2) 1 (3) 739 (4) 287

136. आई व मुलगी यांच्या आजच्या वयांची बेरीज 60 वर्ष आहे. पंधरा वर्षानंतर आईचे वय मुलीच्या त्या वेळच्या वयाच्या दुप्पट होईल तर आई आणि मुलीची आजची वये काढा?

(1) आईचे वय = 40 वर्ष, मुलीचे वय = 20 वर्ष
(2) आईचे वय = 42 वर्ष, मुलीचे वय = 18 वर्ष
(3) आईचे वय = 45 वर्ष, मुलीचे वय = 15 वर्ष
(4) आईचे वय = 47 वर्ष, मुलीचे वय = 13 वर्ष

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

137. पदावली सोडवा $\frac{3}{2}\left\{2\left(\frac{2}{3}-\frac{2}{5}\right)+5\left(\frac{5}{2}-\frac{1}{3}\right)\right\}$ = ________?

(1) $\frac{341}{20}$ (2) $\frac{1047}{90}$ (3) $\frac{349}{60}$ (4) $\frac{1047}{20}$

138. $\frac{1.89}{0.7}+\frac{2.5}{0.05}$ = किती ?

(1) 42.7 (2) 52.7 (3) 5.27 (4) 527

139. एका चार चाकी गाडीची किंमत रु. 4,20,000 आहे. या किंमतीच्या 90% इतका विमा उतरवला. एका अपघातामध्ये गाडीचे पूर्णपणे नुकसान झाले, आणि यामध्ये विमा कंपनीने विमा उतरवल्याच्या मूळ किंमतीच्या 90% रक्कम परत केल्यास, गाडीची मूळ किंमत व कंपनीकडून मिळालेली किंमत यामध्ये किती फरक असेल ?

(1) रु. 68,800 (2) रु. 72,800 (3) रु. 82,800 (4) रु. 79,800

140. $[2^{10}\times 2^{-2}\times 2^{8}]^{x}=256$ तर $x=$?

(1) 0.5 (2) 1 (3) 1.5 (4) 2

141. $\left(1-\frac{1}{3}\right)\left(1-\frac{1}{4}\right)\left(1-\frac{1}{5}\right)\ldots\ldots\left(1-\frac{1}{80}\right)$ ची किंमत काढा.

(1) $\frac{1}{20}$ (2) $\frac{1}{80}$ (3) $\frac{1}{40}$ (4) यापैकी नाही

142. क्रिकेटच्या एका फलंदाजाने त्याच्या 51 व्या सामन्यात काढलेल्या धावांमुळे त्याची धावांची सरासरी 59.6 हून वाढून 60 झाली तर त्याची 51 व्या सामन्यातील धावसंख्या किती ?

(1) 80 (2) 70 (3) 90 (4) 75

143. 1 पासून 100 पर्यंतच्या सर्व नैसर्गिक संख्यांची बेरीज किती ?

(1) 5005 (2) 5055 (3) 5050 (4) 5000

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**144.** एक गावातील जनसंख्येत पहिल्या वर्षी 15% वाढ झाली व दुसऱ्या वर्षी 10% घट झाली. जर त्या गावाची सध्याची जनसंख्या 62100 असेल तर दोन वर्षांपूर्वी त्या गावाची जनसंख्या किती होती ?

(1) 50000 (2) 70000 (3) 60000 (4) यापैकी एकही नाही

---

**145.** $\frac{1}{2\times3}+\frac{1}{3\times4}+\frac{1}{4\times5}+\frac{1}{5\times6}+\frac{1}{6\times7}$ ची किंमत काढा.

(1) $\frac{5}{14}$ (2) $\frac{7}{48}$ (3) $\frac{5}{49}$ (4) $\frac{7}{60}$

---

**146.** एका संख्येत 25% ने वाढ केली व नवीन संख्येत पुन्हा 25% वाढ केली तर एकूण वाढ किती % ?

(1) 50% (2) 55% (3) 55.25% (4) 56.25%

---

**147.** जर $a=8$, $b=3R$ व $\frac{1}{R}=\frac{1}{a}+\frac{1}{b}$ आहे, तर R ची किंमत किती ?

(1) $5\frac{2}{3}$ (2) $\frac{3}{16}$ (3) $4\frac{1}{3}$ (4) $5\frac{1}{3}$

---

**148.** एका मुलाला एका संख्येस 25 ने गुणायला सांगितले होते परंतु त्याऐवजी त्याने त्या संख्येस 52 ने गुणले, त्यामुळे त्याचे उत्तर अचूक उत्तरापेक्षा 324 ने जास्त आले. तर त्या मुलाला कोणत्या संख्येस गुणायला सांगितले होते ?

(1) 12 (2) 15 (3) 25 (4) 32

---

**149.** 42.5 मीटर लांबीच्या सळईपासून, तेवढ्याच व्यासाच्या 85 से.मी. लांबीच्या किती सळ्या बनवता येतील ?

(1) 30 (2) 40 (3) 45 (4) 50

---

**150.** एका थैलीत 20 चेंडू आहेत. त्यापैकी काही लाल व बाकी पांढऱ्या रंगाचे आहेत. सर्व चेंडूंची सरासरी किंमत 25 रु. प्रती चेंडू आहे. जर लाल चेंडूची सरासरी किंमत 20 रु.प्रती चेंडू व पांढऱ्या चेंडूंची सरासरी किंमत 30 रु. प्रती चेंडू. तर लाल चेंडूची संख्या किती ?

(1) 10 (2) 12 (3) 8 (4) 14

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**151.** 7 तास + 15 मिनीटे + 20 सेकंद = किती सेकंद

(1) 24120 (2) 25120 (3) 26120 (4) 27170

---

**152.** युवराजच्या तीन डावातील धावांची सरासरी 72 आहे. चौथ्या डावातील धावा विचारात घेतल्यास त्याच्या चारही डावातील धावांची सरासरी एकने कमी होते तर त्याच्या चौथ्या डावातील धावांची संख्या किती ?

(1) 62 (2) 64 (3) 66 (4) 68

---

**153.** $\frac{2.7+3.7}{0.4} = ?$

(1) 1.6 (2) 0.04 (3) 16 (4) 8

---

**154.** $\frac{3}{1^2 \times 2^2} + \frac{5}{2^2 \times 3^2} + \frac{7}{3^2 \times 4^2} + \frac{9}{4^2 \times 5^2} + \frac{11}{5^2 \times 6^2}$ ची किंमत काढा.

(1) $\frac{321}{360}$ (2) $\frac{35}{36}$ (3) $\frac{48}{49}$ (4) $\frac{99}{100}$

---

**155.** एका वस्तुच्या किंमतीत 45% ने वाढ केल्यानंतर त्या वस्तुची किंमत रु. 87 झाली तर प्रारंभी त्या वस्तुची किंमत किती होती ?

(1) 60 रु. (2) 70 रु. (3) 50 रु. (4) 55 रु.

---

**156.** 9146 ला 33 ने भागले तर येणारी बाकी किती ?

(1) 5 (2) 15 (3) 6 (4) 7

---

**157.** अंकगणितीय श्रेणीच्या लगतच्या चार संख्याची बेरीज 20 आहे आणि 3 ऱ्या व 4 थ्या क्रमांकाच्या संख्याची बेरीज 14 आहे तर त्या संख्या कोणत्या ?

(1) −3, 1, 5, 9 (2) −2, 0, 4, 10 (3) 2, 4, 6, 8 (4) 3, 5, 7, 9

---

**158.** एका सभागृहात पहिल्या रांगेत 20, दुसऱ्या रांगेत 24, तिसऱ्या रांगेत 28 खुर्च्या व अशीच पुढे मांडणी आहे. जर सभागृहात एकूण 30 रांगा असतील तर एकूण किती माणसे सभागृहात बसू शकतील ?

(1) 2400 (2) 2350 (3) 2340 (4) 2300

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**159.** एका गाडीचा वेग जर ताशी 8 कि.मी. वाढवला तर ती 440 कि.मी. चा प्रवास करण्यासाठी 30 मिनिटे कमी घेते तिचा सध्याचा वेग किती ?

(1) ताशी 60 कि.मी. (2) ताशी 70 कि.मी. (3) ताशी 80 कि.मी. (4) ताशी 90 कि.मी.

---

**160.** 18, 24, 22, 23, 14, 28, 14, 17, 18, 14, 25, 14 या संख्यांचा बहुलक (Mode) काय आहे ?

(1) 18 (2) 14 (3) 23.5 (4) 23

---

**161.** $\frac{(3.57)^2-(2.43)^2}{3.57-2.43}$ ची किंमत काढा.

(1) 1.14 (2) 5 (3) 6 (4) 6.43

---

**162.** $s \propto \frac{1}{t}$ जेंव्हा $s=5.5$ व $t=4.4$ तर चलनाचा स्थिरांक खालील पैकी कोणता ?

(1) 2.42 (2) $\frac{1}{5.5}$ (3) 24.2 (4) $\frac{1}{4.4}$

---

**163.** 40 पेक्षा मोठ्या व 60 पेक्षा लहान असणाऱ्या मूळ संख्यांची बेरीज किती ?

(1) 234 (2) 243 (3) 324 (4) 342

---

**164.** एक व्यक्ती आपल्या उत्पन्नाचा 4% भाग अनाथालयाला दान करतो व उर्वरित उत्पन्नाचा 10% भाग बँकेत जमा करतो, तद्नंतर त्याच्याजवळ जर रु. 10800 शिल्लक राहतात तर त्याचे मासिक उत्पन्न किती ?

(1) रु. 12000 (2) रु. 12500 (3) रु. 20000 (4) रु. 13000

---

**165.** जर + चा अर्थ ×, − चा अर्थ ÷, ÷ चा अर्थ +, आणि × चा अर्थ − तर $20 \div 40 - 4 \times 5 + 6 = ?$

(1) 0 (2) 8 (3) 14 (4) 2

---

**166.** चार क्रमवार सम संख्यांची सरासरी 27 आहे तर त्यांच्यापैकी सर्वात लहान संख्या कोणती ?

(1) 22 (2) 24 (3) 26 (4) 28

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

167. जर $x-\frac{1}{x}=\frac{3}{2}$ तर $x^3-\frac{1}{x^3}=$ ________ ?

(1) $\frac{27}{8}$ (2) $\frac{27}{2}$ (3) $\frac{63}{8}$ (4) $\frac{63}{4}$

168. एका परीक्षार्थीने 30% गुण प्राप्त केले परंतु तो 10 गुणांनी अनुत्तीर्ण झाला. दुसऱ्या परीक्षार्थीने 52% गुण प्राप्त केले जे उत्तीर्ण होण्यासाठी लागणाऱ्या कमीत कमी गुणांपेक्षा 34 जास्त आहेत. तर उत्तीर्ण होण्यासाठी कमीत कमी किती टक्के गुण आवश्यक आहेत?

(1) 33 (2) 35 (3) 30 (4) 40

169. जर $12x+13y=29$

व $13x+12y=21$

तर $x+y=$

(1) 1 (2) 2 (3) 3 (4) 0

170. $400+0.04+0.4\times10+.004+0.4=$ किती ?

(1) 44.0444 (2) 440.444 (3) 404.444 (4) 444.404

171. Pick out the **correct** alternative to complete the following sentence.

If she worked regularly, she ________ her goal

(1) may achieve (2) can achieve

(3) might achieve (4) might have achieved

172. I can't read his writing. It is________

(1) eligible (2) illegible (3) legal (4) illegal

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

173. The three primary auxiliaries are :

(1) be, have, do

(2) can, could, would

(3) may, might, must

(4) aught, ought, nought

---

174. She used to play hide and seek with her girl-friends in her childhood.

Which verb-form can be substituted for 'used to' to retain the meaning of this sentence ?

(1) had (2) could (3) was (4) would

---

175. Pick out the **correct** sentence from the following.

(a) Latin is difficult not only to learn but also to speak.

(b) Not only Latin is difficult to learn but also to speak.

(c) Latin is not only difficult to learn but to speak also.

(d) Latin is not only difficult to learn but also to speak.

**Answers :**

(1) (a) only (2) (b) and (c) only (3) (b) only (4) (d) only

---

176. Fill in the blank with the **correct** verb.

I usually walk to college, but today _________ in my uncle's car.

(1) go (2) went (3) walk (4) going

---

177. Choose the **incorrect** sentence.

(1) I can not asleep. (2) I can not sleep.

(3) I can't go to sleep. (4) I can fall asleep.

---

178. A horse _________

(1) neighs (2) roars (3) barks (4) mews

---

**179.** Change the following into **indirect** speech :

"Do you know the way to the museum", the stranger asked.

(1) The stranger asked me whether I knew the way to the museum.

(2) The way to the museum was asked by the stranger to me.

(3) The stranger told me whether I would be able to tell the way to the museum.

(4) The way to the museum was not known so the stranger enquired with me.

---

**180.** Pick out the correct meaning of the underlined phrase.

Dead letter.

(a) a letter written long back

(b) a letter which is dead

(c) a letter which is not claimed by anyone

(d) a letter which is not read by anyone

**Answers :**

(1) (a) only (2) (a), (b) and (d) only (3) (c) only (4) (d) only

---

**181.** What is opposite of the word 'entrance' ?

(1) Door (2) Utterance (3) exit (4) gate

---

**182.** Change the following assertive sentence into exclamatory sentence.

India is a great nation.

(1) What a great nation India is ! (2) Wow ! what a great nation India is.

(3) How great nation India is ! (4) Oh ! what a great nation India is.

---

**183.** If you run fast now, you will get that bus.

This sentence suggests __________

(1) probable action (2) possible action

(3) impossible action (4) uncertain action

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

**184.** Which of the following is an abstract noun ?

(1) bread (2) coffee (3) cheese (4) happiness

**185.** He said to me, "Where does she work ?"

Choose the correct indirect speech of this sentence.

(1) He asked me where she worked.

(2) He asked me where she was working.

(3) He asked me where she is working.

(4) He asked me where she works.

**186.** In the following question three words are given. Choose the word which is spelt wrongly. If there is no mistake choose (4) = all correct.

(1) Convenient (2) Perceive (3) recive (4) All correct

**187.** Which one of the following sentences is **correct** ?

(i) Your lovely friend.

(ii) Your loving friend.

(1) (i)

(2) (ii)

(3) Both (i) and (ii)

(4) Neither (i) nor (ii)

**188.** The Earth moved round the Sun . Point out the part of this sentence that is **incorrect** ?

(1) Object (2) Subject (3) Preposition (4) Verb

**189.** Which one of the following sentences is **correct** ?

(i) He is pleased on me.

(ii) He is pleased with me.

(1) (i)

(2) (ii)

(3) Both (i) and (ii)

(4) Neither (i) nor (ii)

---

**190.** Change the following sentence into question (Yes/No) type.

Prevention is better than cure.

(1) Is prevention better than cure.

(2) Was prevention better than cure.

(3) Were prevention better than cure.

(4) Does prevention better than cure.

---

**191.** Identify the type of the sentence given below :

'For earning more money he worked hard.'

(1) Simple (2) Compound

(3) Complex (4) Complex compound

---

**192.** Fallow-land means land which is __________ .

(1) barren (2) cultivated (3) uncultivated (4) sown

---

**193.** Change the following into Passive Voice.

They gave us some books.

(1) Some books were given to us by them

(2) Books were given to us by them

(3) Books were given by some to us

(4) Books were given to us by some

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**194.** Complete the following sentence with the correct alternative.

Roll out the ________

(1) red pen (2) red carpet (3) red signal (4) red light

---

**195.** Identify the adjective in the sentence.

The hand has five fingers.

(1) hand (2) the (3) fingers (4) five

---

**196.** Change the following affirmative sentence into negative.

Shut the door.

(1) Do not shut the door. (2) Do not open the door.

(3) Do not close the door. (4) Do not exit the door.

---

**197.** Choose the **incorrect** sentence.

(1) We did believe it. (2) We did not believe it.

(3) We did not believed it. (4) We believed it.

---

**198.** Pick out the correct sentence(s) from the following. Choose correct alternative.

(I) This is a worth seeing play.

(II) This play is worth seeing.

**Answers :**

(1) Only (I) is correct

(2) Only (II) is correct

(3) Both (I) and (II) are correct

(4) Both (I) and (II) are incorrect

---

**199.** Say whether the following sentences are **correct** or **incorrect**. Choose the correct alternative.

(I) My brother and his friend commutes every day.

(II) Measles have become less common in the United States.

**Answers :**

(1) Only (I) is correct (2) Only (II) is correct

(3) Both (I) and (II) are correct (4) Both (I) and (II) are incorrect

---

**200.** Which of the statements given below is/are **correct** ?

(I) He has met him. Hasn't he ?

(II) He got first division. Isn't it ?

(III) He got first division. Didn't he ?

**Answers** :

(1) Only (I) is correct

(2) Only (I) and (III) are correct

(3) Only (II) and (III) are correct

(4) All (I), (II) and (III) are correct

---

- o 0 o -

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**सूचना** — (पृष्ठ 1 वरून पुढे....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

## नमुना प्रश्न

प्र. क्र. 201. "अंगावर काटा उभा रहाणे" या वाक्प्रचारचा अर्थ काय?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे

(3) अतिशय भीती वाटणे (4) बहरून येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) अतिशय भीती वाटणे" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. 201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK